लोकसत्ता
विचार
गुरुवार, २९ डिसेंबर २०२२
WWW.LOKSATTA.COM

# वेळ, पैसे वाचविणारी 'मध्यस्थी'

**त्वरित न्यायासाठी सरकार मध्यस्थी विधेयक आणणार असल्याचे सूतोवाच कायदेमंत्री किरेन रिजिजू यांनी केले आहे. न्यायालयांवरचा ताण कमी करण्यासाठी आणि पक्षकारांचा पैसा व वेळ वाचविण्यासाठी मध्यस्थी हा उत्तम पर्याय ठरू शकतो...**

मनीष आसरकर

**'मध्यस्थी'** प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहासात खोलवर रुजलेली आहे. भगवान श्रीकृष्णाने महाभारतात युद्धापूर्वी कौरव आणि पांडवांमध्ये मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याला यश न मिळाल्याने युद्धाची परिणती नंतर अनर्थात झाली. गावकऱ्यांतील वाद ग्रामपंचायतींद्वारे सल्लामसलत करून सोडवले जात. तथापि, भारताने वसाहतवादी राजवटीत विकसित केलेली न्यायव्यवस्था स्वीकारल्याने मध्यस्थी हा प्रकारच विस्मृतीत गेला आहे.

तथापि, जागतिक स्तरावर मध्यस्थीचा पर्यायी विवाद निराकरण यंत्रणा म्हणून प्रभावीपणे वापर केला जात आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच, मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेले विवाद लक्षात घेता, पर्यायी विवाद निराकरण यंत्रणा म्हणून मध्यस्थीचा वापर करण्याची गरज व्यक्त केली आहे. आज देशभरात तीन कोटींहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्या विवादांचे निराकरण होण्यास अनेक वर्षे लागतील.

भारताचे माजी सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांचे यासंदर्भातील वक्तव्य विवादांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने मध्यस्थीचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी पुरेसे आहे. ते म्हणतात, 'न्यायालय हा शेवटचा उपाय असावा; लवाद, मध्यस्थी, सामंजस्याचा प्रयत्न करावा. विवाद निराकरणासाठी अनिवार्य पहिली पायरी म्हणून मध्यस्थीसाठी कायदा असावा.' भारत-सिंगापूर मध्यस्थी शिखर परिषदेत कायदेमंत्री किरेन रिजिजू यांनी मध्यस्थीच्या गरजेवर भर दिला. त्वरित न्यायासाठी सरकार मध्यस्थी विधेयक आणणार, असल्याचे रिजिजू म्हणाले. सरकारने मध्यस्थी प्रक्रिया नियंत्रित करण्यासाठी मध्यस्थी कायदा विकसित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

### मध्यस्थी म्हणजे काय?

मध्यस्थी ही एक प्रक्रिया आहे ज्यामध्ये प्रशिक्षित मध्यस्थाद्वारे, पक्ष स्वतः वाटाघाटी करतात आणि त्यांच्या मतभेद किंवा विवादांचे परस्पर स्वीकार्य निराकरण करतात. या प्रक्रियेत मध्यस्थाची भूमिका वाटाघाटी सुलभ करणे आणि त्यांच्यातील विवाद किंवा मतभेदांचे सौहार्दपूर्ण निराकरण करण्यासाठी संबंधित पक्षांना मदत करणे ही आहे. ही मध्यस्थामार्फत करावयाची सुलभ वाटाघाटीची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत मध्यस्थांकडून कोणताही आदेश दिला जात नाही. मध्यस्थ फक्त समझोता कराराद्वारे दोन किंवा अधिक पक्षांमध्ये झालेल्या समझोत्याची नोंद करतो.

न्यायालय आणि लवादाच्या कार्यवाहीमध्ये, न्यायाधीश आणि लवाद, तथ्ये आणि कायदेशीर तरतुदींच्या आधारे, जो निकाल देतात, तो दोन्ही पक्षांना मान्य असेलच असे नाही. सामंजस्याची कार्यवाही मध्यस्थीच्या अगदी जवळ जात असली तरी, वस्तुस्थिती जाणून घेतल्यानंतर सामंजस्य घडवून आणणारी व्यक्ती विवादित पक्षांना पर्याय देते आणि पक्षांना त्यापैकी एक पर्याय निवडणे आवश्यक असते. मध्यस्थीच्या बाबतीत मात्र असे नसते. व्यवसायांना मध्यस्थी का आवश्यक आहे?

### प्रलंबित विवाद

भारतातील न्यायव्यवस्थेवरील ताण पाहता, प्रलंबित वाद मिटवायला बरीच वर्षे लागतात. प्रलंबित खटल्यांमुळे न्यायव्यवस्थेची गती मंदावली आहे. याचिकाकर्ते कनिष्ठ न्यायालयाच्या निकालावर समाधानी नसल्यास, त्यांच्याकडे उच्च न्यायालयांसमोर अपील दाखल करण्याचा पर्याय असतो, त्यामुळे अंतिम निकाल मिळेपर्यंत आणखी विलंब होतो. लवादातही निकाल प्राप्त करण्यासाठी सुमारे दोन वर्षे लागतात. या निकालांनाही उच्च न्यायालयात आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने निकाल दिल्यानंतर किंवा लवादाने निवाडा दिल्यानंतरही, भारतात दिलेला निर्णय अमलात आणण्यासाठी आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी बराच कालावधी जातो.

### खटल्यांचा खर्च

भारत सरकारच्या कायदा आणि न्याय मंत्रालयाच्या सूत्रानुसार, खटल्याची अंदाजे किंमत दाव्याच्या मूल्याच्या सुमारे ३७ टक्के आहे. (याचिकाकर्त्याला सर्वोच्च न्यायालयाकडून अंतिम निर्णय मिळत नाही तोपर्यंत) याचिकाकर्ते न्यायालयाच्या निर्णयाचा अंदाज लावू शकत नाहीत. लवादाचा खर्चदेखील त्याच श्रेणीत कमी-अधिक आहे. तर, मध्यस्थीची अंदाजे किंमत विवाद मूल्याच्या तीन ते पाच टक्क्यांपर्यंत असते. तिथे निकाल पक्षांकडून नियंत्रित केला जातो कारण मध्यस्थी प्रक्रिया पक्षांद्वारे नियंत्रित केली जाते.

### सुयोग्यता

सामान्यतः मध्यस्थी व्यावसायिक, गैर-व्यावसायिक (गुन्हेगारी प्रकरण वगळता) अशा सर्व प्रकारच्या विवादांसाठी योग्य आहे. व्यवसायाचे स्वरूप आणि आकार विचारात न घेता सर्व व्यवसाय मध्यस्थीला सहमती देऊ शकतात. कंपन्या, विशेषतः स्टार्टअप्स, एमएसएमई आणि उदयोन्मुख कंपन्या, ज्यांच्याकडे कायदेशीर विभाग असण्याची शक्यता कमी असते, तसेच दावा दाखल करण्यासाठी किंवा बचाव करण्यासाठी पुरेशी संसाधने नसतात, अशा कंपन्यांसाठी मध्यस्थी नक्कीच उपयुक्त ठरेल. न्यायालयाच्या प्रलंबित प्रकरणांत किंवा लवादाच्या प्रक्रियेदरम्यान मध्यस्थी कधीही सुरू केली जाऊ शकते.

### कायदेशीर मान्यता

भारतात मध्यस्थीला कायदेशीर मान्यता आहे. सिव्हिल प्रोसिजर कोड १९०८ च्या कलम ८९ ऑर्डर X१ ए, १ सी, १ डी आणि XXXI- ए नुसार न्यायनिवाडा पुढे जाण्यापूर्वी न्यायालयाने सलोख्याने किंवा वाटाघाटीद्वारे तोडगा काढण्यासाठी वाजवी संधी प्रदान करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, व्यावसायिक न्यायालय कायदा २०१५च्या (२०१८ मध्ये सुधारित केल्याप्रमाणे) कलम १२ ए नुसार खटला दाखल करण्यापूर्वी सर्व व्यावसायिक विवादांना प्री-लिटिगेशन मध्यस्थीतून जाणे अनिवार्य आहे. ग्राहक संरक्षण कायदा, कंपनी कायदा, व्यावसायिक न्यायालय कायदा, एमएसएमई कायदा, रिअल इस्टेट कायदा याअंतर्गत मध्यस्थीची तरतूद आहे. सर्व नागरी/व्यावसायिक विवादांत मध्यस्थी केली जाऊ शकते.

सीमापार (क्रॉस बॉर्डर) विवादांसाठीदेखील मध्यस्थी केली जाऊ शकते. भारताने २०१९ च्या सिंगापूर कन्व्हेन्शनवर स्वाक्षरी केली आहे. परिणामी व्यवसायांना सीमापार व्यावसायिक विवाद सोडवण्यासाठी मध्यस्थीवर अवलंबून राहता येईल. असे झाल्यास आंतरराष्ट्रीय वाणिज्य वाढीस मदत होईल. मध्यस्थीचे फायदे पाहूया...

### विवादांचे जलद निराकरण

मध्यस्थी ही अनौपचारिक, ऐच्छिक, पक्ष-नियंत्रित प्रक्रिया असल्याने विवादाचे निराकरण करण्यासाठी तुलनेने कमी वेळ लागतो. विवादाच्या जटिलतेनुसार निराकरणास सामान्यतः दोन तास ते दोन महिने लागतात.

### कमी खर्च

मुद्रांक शुल्क नाही, कोर्ट फी नाही. या प्रक्रियेत वकिलांचीही गरज भासणार नाही, कारण पक्ष वस्तुस्थितीच्या आधारावर एकमेकांशी वाटाघाटी करतात. मध्यस्थी आणि मध्यस्थी करणाऱ्या संस्थांचे शुल्क विवादित रकमेवर आधारित असते.

### दोन्ही पक्षांसाठी अनुकूल परिस्थिती

मध्यस्थीचे वैशिष्ट्य असे आहे की, कोणीही जिंकत नाही किंवा हरत नाही. न्यायालय किंवा लवादामध्ये, विवादातील पक्षांपैकी एकाच्या बाजूने निर्णय किंवा निवाडा दिला जातो. हे अनेकदा पक्षांमधील संबंध बिघडवते, परिणामी भविष्यातील व्यवसायाचे दरवाजे बंद होऊ शकतात.

### गोपनीयता राखणे

मध्यस्थी खासगी आणि गोपनीय असते. पक्षकारांमधील चर्चा किंवा वाटाघाटी चार भिंतींच्या पलीकडे जात नाहीत. सौहार्दपूर्ण तोडगा निघाला नाही, तरीही न्यायालय किंवा लवादाच्या कार्यवाहीदरम्यान, पक्षांमधील अशा चर्चा आणि वाटाघाटींना पुरावा म्हणून मान्यता दिली जात नाही.

### मध्यस्थी सुरू करण्यातील सुलभता

पक्ष खासगी मध्यस्थांशी किंवा मध्यस्थी सेवा प्रदान करणाऱ्या संस्थांशी संपर्क साधू शकतात आणि कधीही मध्यस्थी सुरू करू शकतात, म्हणजे न्यायालयात खटला दाखल करण्यापूर्वी, लवादापुढे जाण्यापूर्वी मध्यस्थीचा पर्याय स्वीकारता येतो. न्यायालयीन वा लवादाच्या कार्यवाहीदरम्यान मतभेद निर्माण झाले आणि त्यांचे विवादांत रूपांतर झाले नसेल, तरीही पक्ष मध्यस्थीचा पर्याय निवडू शकतात. न्यायालये ही सुविधा न्यायालय संलग्न मध्यस्थी केंद्रांद्वारेदेखील प्रदान करतात.

### यशाची शक्यता

मध्यस्थीतील यश मुख्यत्वे मध्यस्थांच्या कौशल्यावर अवलंबून असते. विवाद सोडविण्याच्या पक्षांच्या इच्छेवरदेखील बरेच काही अवलंबून असते. पक्षांनी विवाद सुरू ठेवण्याचे ठरवले असेल तर अगदी मूलभूत विवादांचेदेखील निराकरण होत नाही. पक्षांनी मध्यस्थीकडे मोकळ्या मनाने संपर्क साधला आणि विवाद सोडवण्याचा खरा हेतू असेल, तर मध्यस्थीमध्ये ते साध्य होण्याची निश्चित शक्यता असते. आकडेवारी दर्शविते की मध्यस्थी यशस्वी होण्याचा दर ७० ते ७५ टक्के आहे.

विविध व्यवसाय त्यांच्या सुरू असलेल्या किंवा संभाव्य खटल्यांसाठी दरवर्षी त्यांच्या पुस्तकांमध्ये मोठ्या रकमेची तरतूद करतात. व्यवसायांनी त्यांनी केलेल्या प्रत्येक करारामध्ये मध्यस्थीसाठी सहमती दर्शवली आणि या पर्यायाद्वारे मतभेद दूर करण्याची मानसिकता विकसित केली, तर नक्कीच त्यांचा वेळ आणि पैसा वाचेल. खटल्यांचा धोका कमी होईल. हे सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यावसायिक संबंध जपले जातील. 'व्यवसाय सुलभता' हे सरकारचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मध्यस्थी रुजणे आवश्यक आहे. हा लेख व्यावसायिक मध्यस्थीवर केंद्रित असला तरीही, मध्यस्थीचा उपयोग गैरव्यावसायिक विवादांच्या निराकरणासाठीही केला जाऊ शकतो.

लेखक कॉर्पोरेट वकील आणि मध्यस्थ आहेत.
manissh@assarkarco.in